# मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई

## गिरणी कामगार सदनिका सोडत - MMRDA-१/२०१६

**संदर्भ : शासनाचे पत्र क्र.टिबीपी ४३१४/१४८७/प्र.क्र.१८/२०१५/नवि-११ दिनांक.०२.११.२०१६**

| |
|---|
| **सोडतीचा दिनांक :- ०२/१२/२०१६, वेळ - सकाळी १०.०० वाजता** |
| **स्थळ - रंगशारदा सभागृह, के.सी.मार्ग, वांद्रे रिक्लेमेशन, वांद्रे (प), मुंबई-४०००५०** |

I) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील बंद / आजारी गिरण्यांच्या गिरणी कामगारांना घरे देण्याच्या निर्णयाच्या अनुषंगाने शासनाच्या वतीने म्हाडा मार्फत गिरणी कामगारांची माहिति संकलीत करण्यात आली होती. सदर माहिती शासनास यापूर्वीच सादर केलेली असुन म्हाडाच्या संकेतस्थळावरही प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. आता शासनाकडुन संदर्भाधिन आदेशान्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) यांनी मौजे कोन, ता.पनवेल, जि.रायगड येथे भाडेतत्वावरील बांधलेल्या प्रत्येकी १६० चौ.फुटाच्या दोन सदनिका (परिस्थितीनुरुप शक्य असलेली जोडघरे) अश्या एकुण २४१७ सदनिका / युनिट (१६० चौ.फुटाच्या दोन सदनिका मिळुन एक युनिटसाठी रुपये सहा लाख फक्त आकारुन ) वितरीत करण्यास्तव म्हाडामार्फत संगणकीय सोडत काढण्याबाबत निर्देश प्राप्त झाले आहेत.

II) म्हाडाने यापूर्वी http://mhada.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या १,४८,७११ या अर्जदार गिरणी कामगार / वारस यांच्या यादीमधून खालील [अ],[ब] व [क] मध्ये दर्शविलेल्या अर्जदार गिरणी कामगार / वारस यांना वगळुन सोडत काढण्याचे योजिले आहे.

अ) सन २०१२ च्या सोडतीमध्ये यशस्वी झालेले अर्जदार.

ब) सन २०१२ च्या सोडतीतील यशस्वी अर्जदारांपैकी अंतिमत: अपात्र झालेल्या अर्जदारांऐवजी कार्यन्वीत करण्यात आलेल्या प्रतिक्षा यादीमधील अर्जदार

क) दिनांक ०९.०५.२०१६ च्या सोडतीमध्ये यशस्वी झालेले अर्जदार.

III) स्वान मिल कुर्ला / शिवडी या मिलच्या अर्जदारांनी मा.उच्च न्यायालयामध्ये याचिका क्र. ३०८६ सन २०१४ व नोटीस ऑफ मोशन क्र. ८३ सन २०१६ दाखल केलेले असल्यामुळे अशा अर्जदारांचा मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अधिन राहून सदर सोडतीमध्ये समावेश करण्यात येत आहे.

IV) अशा रितीने सदर सोडतीमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या गिरणी कामगार / वारस यांची माहिती म्हाडाचे संकेतस्थळ http://mhada.maharashtra.gov.in येथे प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

V) **सोडतीच्या अटी व शर्ती :-**

- म्हाडा संकेतस्थळ http://mhada.maharashtra.gov.in येथे प्रसिद्ध करण्यात आलेल्या गिरणी कामगार / वारस यांच्या माहिती प्रमाणेच अर्जदारांमधुन संगणकीय सोडत काढण्यात येईल.
- शासनाने वेळोवेळी पारीत केलेल्या आदेश / निर्देशानुसारच सोडत, पात्रता निश्चिती व सदनिका वितरणाची कार्यवाही करण्यात येईल.
- गिरणी कामगार पती / पत्नी / वारस यापैकी मूळ गिरणी कामगार अथवा त्यांच्या वारसांचा फक्त एका युनिटसाठी (१६० चौ.फूटाच्या दोन सदनिका मिळुन एकत्रित एक युनिट )विचार करण्यात येईल.
- **संगणकीय सोडतीमध्ये कोणत्याही प्रकारचा मानवी हस्तक्षेप होऊ शकत नाही. या करीता अर्जदारांना विनंती करण्यात येते की, अशा प्रकारच्या कोणत्याही प्रलोभनास बळी पडु नये. त्याकरीता म्हाडा जबाबदार राहणार नाही.**
- सदनिकांच्या वितरणासाठी कोणालाही म्हाडाने प्रतिनिधी, सल्लागार अथवा प्रॉपर्टी एजन्ट म्हणुन नेमलेले नाही. अर्जदाराने कोणत्याही अशा व्यक्तींशी परस्पर व्यवहार करु नये. तसे केल्यास मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ / म्हाडा कोणत्याही व्यवहारास / फसवणुकीस जबाबदार राहणार नाही.
- सोडतीत यशस्वी झालेल्या अर्जदारांची पात्रता निश्चित झाल्यानंतर सदनिकेची किंमत / मुद्रांक शुल्क / सेवाशुल्क, इत्यादी अर्जदारास भरणे बंधनकारक राहील.
- काही गिरणी कामगाराच्या संबधात मा.न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेच्या निर्णयाच्या अधिन राहुन संगणकीय सोडत काढण्यात येत आहे.
- जाहिरातीच्या व सोडतीच्या अनुषंगाने म्हाडाकडुन / शासनाकडुन काही नवीन सुचना प्राप्त झाल्यास तसे म्हाडाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल.
- जाहिरातीमध्ये अनावधानाने झालेल्या चुकांचा कोणत्याही प्रकारे अर्जदारास फायदा घेता येणार नाही.

टिप :- सर्व संबधितांस आवाहन करण्यात येते की, अर्ज सादर केलेली पोच पावती व ओळखपत्रासह सोडतीच्या दिवशी सभागृहात उपस्थित रहावे. सभागृहात उपलब्ध आसन व्यवस्थेनुसारच "प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य" या धर्तीवर प्रवेश देण्यात येईल.

**अधिक माहितीसाठी संपर्क**

"म्हाडा लॉटरी केंद्र "
मित्र कार्यालयाशेजारी गेट नं.५ जवळ, गृहनिर्माण भवन
वांद्रे (पु), मुंबई-५१
हेल्प लाईन नं.- ९८६९९८८०००
(०२२-२६५९८९२१ ते २४)
०२२-२६५९२६९२/९३
म्हाडा संकेतस्थळ- https://mhada.maharashtra.gov.in/?q=millworkers_lottery

**(सुभाष लाखे)**
मुख्य अधिकारी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
मुंबई